■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९० ■ मंगळवार दि.८ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 290 ■ Tuesday Dt.8 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# जलजीवनच्या १८०० कोटीच्या कामाची चौकशी होणे गरजेचे?

## बीड जिल्ह्यात जलजीवन योजनेत कोट्यावधी रुपयांचा घोटाळा; ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची साटेलोटे?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## कोट्यावधी रुपयांचे कामे फक्त कागदावरच; जलजीवन मिशन घोटाळ्यात जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर कधी येणार?

# जलजीवन योजनेत निकृष्ट काम कोट्यवधींच्या भांडवलात लुकरे, ठेकेदारांमुळे ग्रामस्थ आले रडकुंडीला?

## जलजीवन योजनेतील कोट्यवधींच्या घोटाळ्याची ठसठशीत चौकशी करण्याची मागणी?

## जिल्ह्यातील आमदारांनी याप्रकरणी विधानसभेत आवाज उठवणे गरजेचे; विधानसभेत आवाज उठवणार का याकडे सर्वांचे लक्ष?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या जलजीवन योजनेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या योजनेत ठेकेदार, अधिकाऱ्यांची मिलीभगत असून पाईपलाइन, पाणी टाक्या, मोटारींच्या खरेदीत मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यांमध्ये योजना पूर्ण झाल्याचे दाखवून कामे अर्धवट ठेवली गेली आहेत. याशिवाय, निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर करून शासकीय निधी लाटल्याचे उघडकीस आले आहे. काही ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या नावाखाली लाखो रुपये खर्च दाखवले गेले, परंतु प्रत्यक्षात गावकऱ्यांना पिण्याचे पाणी अजूनही मिळालेले नाही. या प्रकरणाची गंभीर दखल जिल्ह्यातील आमदारांनी विधानसभेत आवाज उठवणे गरजेचे आहे. तसेच यावर आवाज उठवणार का हे देखील पाहणं तितकेच महत्त्वाचे आहे. गरिबांच्या हक्काच्या पाण्यावर डल्ला टाकणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवायला पाहिजे.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाने याबाबत प्राथमिक चौकशी करून संबंधित कंत्राटदारांची व अधिकाऱ्यांची चौकशी सुरू करणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत अनेक ठिकाणी कामे कागदावरच झाल्याचा आरोप आहे. गावागावात शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट असलेल्या या योजनेत ठेकेदार आणि प्रशासनाच्या संगनमताने निधीचा गैरवापर झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत उघडकीस आलेले हे घोटाळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या मूलभूत गरजांवर परिणाम करत आहेत. या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार टाळता येतील.

बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशनची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. या योजनेत ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी निधी हडप केला असल्याचे सांगितले जात आहे. फक्त २५ टक्के काम करून ७० टक्के कामाचे बिल काढण्यात आले असून, काही ठिकाणी केवळ कागदोपत्रीच योजना पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे. कोट्यवधी रुपयांचा घोटाळा उघडकीस आल्यामुळे या महत्त्वाकांक्षी योजनेच्या पारदर्शकतेवर आणि कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

योजनेअंतर्गत पाणीपुरवठा कामांसाठी देण्यात आलेल्या कंत्राटांमध्ये नियमबाह्य पद्धतीने मंजुरी, निकृष्ट दर्जाचे साहित्य आणि अपूर्ण कामे यामुळे ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांबरोबरच ठेकेदारांवरही कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणामुळे जल जीवन योजनेची विश्वासार्हता धोक्यात आली असून, या घोटाळ्यामुळे हजारो नागरिक पाण्याच्या मूलभूत सुविधेपासून वंचित राहिले आहेत.



**जलजीवन योजनेचा निधी ठेकेदारांनी गिळला; ठेकेदारांवर कारवाई होणार का?**

# बीडच्या शिक्षण विभागात कोट्यवधींचा अपहार, शिक्षण विभागात भ्रष्टाचाराचा भांडाफोड?


## शिक्षक भरती घोटाळ्याची माहिती दाबण्यासाठी सादिक इनामदार यांच्यावर खोटा गुन्हा दाखल?

## कोट्यवधी रुपयांचा घोटाळा आणि अजूनही कोणी जबाबदार नाही हा न्याय आहे का? शिक्षण की भ्रष्टाचार कोट्यावधींचा घोटाळा उघड असताना अधिकारी आणि नेते गप्प का?







बीड । प्रतिनिधी

बीडच्या शिक्षण विभागात पाचशे कोटी रुपयांचा घोटाळ्याचा प्रकार अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. शिक्षण विभाग जिथे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचं काम केलं जातं, तिथेच जर आर्थिक अपहार किंवा भ्रष्टाचार होत असेल, तर त्याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होते. शिक्षण विभागात कोट्यवधी रुपयांचा मोठा आर्थिक घोटाळा उघडकीस आला असून, खाजगी संस्थांमध्ये बोगस शिक्षक भरती तसेच शिक्षणासाठी असलेल्या विविध योजनांचा निधी अपहार करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या हक्काच्या सुविधा आणि शैक्षणिक प्रगतीला मोठा धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विशेष तपास पथक एसआयटीची नेमणूक केली आहे. तसेच काही वरिष्ठ अधिकारी निलंबित होण्याची शक्यता असून, संबंधित खाजगी संस्था चालक एसआयटी कारवाईच्या रडारवर आहेत. या घोटाळ्याचा पूर्ण तपास होईपर्यंत आणि दोषींना शिक्षा होईपर्यंत हा विषय प्राधान्याने उचलून धरणे आवश्यक आहे. कारण शिक्षण हे केवळ हक्क नाही, तर देशाच्या भविष्याची पायाभरणी आहे. बोगस शिक्षक भरती घोटाळा आणि शिक्षण विभागात ५०० कोटी रुपयांचा घोटाळा समोर आल्याने बीडच्या शिक्षण खात्यात खळबळ उडाली आहे. हा घोटाळा केवळ आर्थिक नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत केलेली बेइमानी आहे. सरकारने जशी तत्परता

पान २ वर

> बेडसकर उपसंचालक यांच्याकडून शिक्षण क्षेत्रातील येणाऱ्या सर्व अडचणी दूर करून आर्थिक तडजोड करणारा मोहरा म्हणून ओळखला जातो बेडस्करची सखोल चौकशी करून बेडस्करच्या कार्य काळामध्ये बेडस्करला लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार अटक करून गुन्हा दाखल झाला होता व बेडस्करची एकूण संपत्ती किती आहे हे तपासणी गरजेचे आहे उपसंचालका सह राजकीय नेते व बीडचे शिक्षणाधिकारी यांच्यात आर्थिक तडतडीतला मोठा दुवा बेडस्कर नावाचा अधिकारी आहे अशी चर्चा जिल्हा परिषद परिसरात चालू आहे?

# अमृत योजना रखडल्यास जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत बेमुदत ठिय्या आंदोलनाचा इशारा

## कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड यांची भेट; जनहित याचिकेचाही इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिक गेल्या आठ वर्षांपासून अमृत अटल पाणीपुरवठा योजनेच्या पूर्णतेची प्रतीक्षा करत असूनही, आजतागायत योजनेचा लाभ त्यांना मिळालेला नाही. याच पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने १३ जून रोजी निवेदन देऊन सुद्धा कुठलीही कार्यवाही न झाल्याने, पक्षाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य अभियंता मनीषा पलांडे व अधीक्षक अभियंता दीपक कोळी यांची भेट घेऊन पुन्हा निवेदन सादर करण्यात आले होते. याच निवेदनाचा पाठपुरावा म्हणून आज बीड



येथील मा. नागझरे साहेब कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

या निवेदनात बीड शहरातील नागरिकांना वेळेवर व योग्य प्रमाणात पाणी न मिळाल्याबाबत संताप व्यक्त करण्यात आला. माजलगाव धरण भरलेले असूनही बीडकरांना पाणी मिळत नसल्यामुळे उशाला पाणी, गळ्याला कोरड अशी अवस्था निर्माण झाली आहे. यासाठी नगरपरिषद प्रशासन, गुत्तेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची हलगर्जी व भ्रष्ट कारभार जबाबदार असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे.

११४ कोटींची अमृत योजना अपूर्ण असतानाही, १०० कोटींचे बील गुत्तेदारांना अदा करून ते पसार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काम अपूर्ण असतानाही बील दिल्यामुळे लाखो नागरिकांना अजूनही स्वच्छ पाणी मिळालेले नाही. नगरपरिषद अधिकारी म्हणतात, पाणी बीडला कधीच मिळणार नाही, ही उदासीनता धक्कादायक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पक्षाच्या वतीने बीड शहरातील अपूर्ण राहिलेल्या कामांची यादीही सादर करण्यात आली असून, जर सहा दिवसांच्या आत यावर कारवाई झाली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन छेडले जाईल तसेच जनहित याचिका हायकोर्टात दाखल केली जाईल, असा इशारा पक्षाने दिला आहे. या प्रसंगी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे व शहराध्यक्ष सय्यद सादिक रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मतदार यादीच्या वादावर काँग्रेसची अंतर्गत समिती बीडमधून अशोक पाटील असणार समितीवर

बीड । प्रतिनिधी

राज्यात लोकसभा निवडणुकीनंतर आणि विधानसभा निवडणुकीच्या अगोदर मतदारयाद्यांमध्ये मोठ्याप्रमाणावर नावे नोंदविली गेल्याचा आक्षेप काँग्रेसने नोंदविला होता, त्याला निवडणूक आयोगाने उत्तर देखील दिले, मात्र त्या खुलाशावर काँग्रेस पक्षाचे समाधान झालेले नाही, त्यामुळे या प्रकरणात पुढील दिशा ठरविणे आणि भविष्यात मतदारयाद्यांमध्ये गोंधळ होऊ नये यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी काँग्रेसने एक अंतर्गत समिती माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली आहे. यात बीड जिल्ह्यातून माजी मंत्री अशोक पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात मागच्या वर्षाच्या अखेरीला विधानसभा निवडणुका झाल्या होत्या. त्या निवडणुकीत लोकसभेच्या तुलनेत मोठ्याप्रमाणावर मतदार वाढविण्यात आल्याचा आक्षेप काँग्रेस पक्षाने घेतला होता. या संदर्भात स्वत: राहुल गांधी यांनी देखील अनेकदा कठोर भाष्य करीत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर भाष्य केले. काँग्रेसने पर्यट्कषात तक्रार केल्या नंतर निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या आक्षेपात तथ्य नसल्याचे व मतदारयादीत मतदारांची वाढ नियमानुसारच असल्याचे स्पष्ट केले होते.

मात्र आयोगाच्या या खुलाशाने काँग्रेसचे समाधान झालेले नाही. आता याविषयात पुढील दिशा काय असावी आणि भविष्यात मतदारयाद्यांमध्ये असला 'गोंधळ' होऊ नये यासाठी काय पाऊले उचलावीत याच्या सूचना करण्यासाठी काँग्रेस पक्षाने एक अंतर्गत समिती गठीत केली आहे. पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत या समितीत प्रफुल्ल गुडदे, माजी मंत्री अशोक पाटील, राजेश शर्मा, धनंजय चौधरी, परीक्षित जगताप हे सदस्य असणार असून समितीचे समन्वयक म्हणून अभय छाजेड काम पाहणार आहेत.

पान १ वरून...

## बीडच्या शिक्षण विभागात कोट्यवधींचा अपहार

दाखवली आहे, तशीच तडफदार अंमलबजावणी अपेक्षित आहे. जनतेंनही सजग राहून या प्रकरणावर लक्ष ठेवणं अत्यावश्यक आहे. या घटनेमुळे शिक्षक भरती प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. अनेक पालक आणि शिक्षणप्रेमींनी यावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. शिक्षणात गुणवत्ता आणि पारदर्शकता टिकवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेण्याची मागणी जोर धरत आहे.

तसेच तक्रारदार वर दबाव आणून खोटे गुन्हे दाखल करून आणि शिक्षक भरती घोटाळ्याची माहिती लपवणाऱ्या माध्यमिकचे शिक्षणाधिकारी श्रीमती यारानी पाटील यांची यांची एसआयटीमार्फत चौकशी होणार असल्याची माहिती मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शिक्षक भरती खाजगी घोटाळ्यासंदर्भामध्ये अनेक दिवसांपासून तक्रारी सुरू आहेत. शासनाकडून शिक्षण आयुक्त यांना चौकशीचे आदेश दिले, शिक्षण आयुक्त यांनी उपसंचालक छत्रपती संभाजी नगर शिक्षण विभाग यांना चौकशी समिती नियुक्ती करून चौकशी करण्याचे आदेश दिले परंतु ज्यांनी शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये शालार्थ आयडी घोटाळा केलेला आहे त्या घोटाळे बाजांनाच त्या ठिकाणी चौकशी करण्याचे आदेश दिले ते चुकीचे आहे. त्यानंतर तक्रारदार सादिक इनामदार यांनी नागपूर येथील चौकशी समिती किंवा एसआयटीची नियुक्ती करा अशी मागणी शासन व शिक्षण आयुक्त यांना केली परंतु अद्याप पर्यंत कोणताही फेरबदल करण्यात आला नाही. त्यानंतर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे व प्रधान सचिव शालेय शिक्षण रणजीत देवल व शिक्षण आयुक्त सचिनंद्र प्रतापसिंह हे छत्रपती संभाजी नगर येथे आले असता त्यांच्याकडे सर्व शिक्षक भरती घोटाळा संदर्भातील पुरावे व तक्रारदार सक्षम भेटून दिले आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक शिक्षक आमदार व इतर आमदारांनी विधानसभेमध्ये प्रश्न उपस्थित केला. नंतर विधानसभेमध्ये शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी एसआयटी मार्फत चौकशी करण्याची घोषणा केली.

या चौकशी समितीमध्ये चौकशी समिती प्रमुख हा आयपीएस दर्जाचा अधिकारी नियुक्त करणार आहेत. यामध्ये माहिती अधिकारापासून ते अपिलापर्यंत कशा पद्धतीने शिक्षक भरती घोटाळा करण्यात आला अंशत: अनुदानित वरून शंभर टक्के अनुदानित वरती कसे बदल्या करण्यात आल्या रिक्त जागेवरती कसे शिक्षक भरती करण्यात आले २००५ ते २०१२ पर्यंत बोगस अक्षराच्या आधारे शिक्षण सेवक व कायम मान्यता कसे देण्यात आले व त्यांचे थकीत वेतन करोड रुपयात काढण्यात आले. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशाचा संदर्भ देऊन शिक्षक भरती करण्यात आली परंतु, न्यायालयाने शासन नियमाला अधीन राहून व कायद्याच्या चौकटीमध्ये तुमच्याकडे प्रलंबित असलेला प्रस्तावावरती निर्णय घ्यावा, परंतु नियुक्त द्यावी असा कुठेही उल्लेख नाही. तसे यावरील पूर्ण कागदपत्रांची माहिती अधिकारांमध्ये सादिक इनामदार यांनी मागितली असल्याने त्यांना माहिती मिळू शकली नाही. त्यानंतर त्यांनी माहिती अधिकाराची अपील केले व त्यांना दि.२७- ६- २०२५ रोजी सुनावणीची अपील ठेवली परंतु ती अपील ची तारीख रद्द करण्यात आली वेळोवेळी प्रकरणासंदर्भामध्ये माझ्यावरती खोटे सुद्धा गुन्हे दाखल करणार आहे. या संदर्भात पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व शिक्षणाधिकारी माध्यमिक व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना यापूर्वीही लेखी स्वरूपात तक्रार देऊन पूर्वक कल्पना देण्यात आली होती. परंतु दि.२७-०७- २०२५ रोजी अपील ची तारीख घेण्यासाठी बोलावले व त्या कार्यामध्ये प्रवेश करताना तक्रारदार सादिक इनामदार यांनी मोबाईलचा व्हिडिओ कॅमेरा ऑन केला व त्या कार्यालय मध्ये प्रवेश केला असे असताना त्या ठिकाणी वेळेनुसार शिक्षणाधिकारी नाना हजारे व कार्यालयीन अधीक्षक अजय बहिर यांच्याशी अपील संदर्भात चर्चा झाली. व त्यांनी सांगितले की तुम्हाला व्हाट्सअप वरती अपील ची तारीख कळवू, तक्रारदार सादिक इनामदार यांना मिळालेल्या माहितीनुसार शिक्षणाधिकारी प्रिया राणी पाटील हे त्यांच्याविरुद्ध विनयभंगासारखा खोटा गुन्हा दाखल करणार आहे.

यापूर्वीच तक्रारदार यांनी लेखी तक्रार दिली होती की माझ्यावरती खोटा गुन्हा दाखल करणार आहेत तसे शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्या अगोदरच तक्रारदार यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेले होते. तक्रार घेण्यात आली नाही कॅम्पुटर बंद आहे व आता तक्रार घेता येणार नाही असे त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांनी सांगितले होते. त्यानंतर त्यांना शहर पोलीस स्टेशन येथे येण्यासाठी सांगितले तेथे गेल्यानंतर दोन-तीन तास त्यांना बसवून ठेवण्यात आलं व त्यानंतर परत त्यांना शहर पोलीस स्टेशन येथील कर्मचाऱ्यामार्फत शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे घेऊन आले व त्या ठिकाणी त्यांच्या विरोधामध्ये शिक्षक भरती घोटाळा प्रकरण दाबण्यासाठी खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गांधीजींच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या शुक्लाचा बीड काँग्रेसच्या वतीने निषेध

बीड । प्रतिनिधी

बीड येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन पुणे येथे झालेल्या महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी निषेध व्यक्त करत सुरज शुक्ला नामक माथेफिरूवर कठोरात कठोर शासन करण्याची मागणी काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. यावेळी काँग्रेसचे बीड



### महात्मा गांधी हे विचार आहेत ते कधीही संपत नसतात : गणेश बजगुडे पाटील

तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी गांधीजींच्या विटंबनेचा निषेध व्यक्त करत गांधी हा विचार असुन तो कधीही संपत नसतो अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी बीड काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, शहराध्यक्ष परवेझ कुरेशी, संतोष निकाळजे, रामधन जमाले, अशोक बहिरवाळ, ॲड. विशाल मस्के, मिलिंद मस्के, शेख अमीर, कादर बबामिया इनामदार, रणजित शेळके, बीड शहर बचाव मंचचे नितीन जयभाय यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खाजगी कंपन्यांना वीज पुरवठ्याचा परवाना देण्याच्या धोरणा विरोधात महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनचा संपाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन वीज नियामक आयोग व महावितरण कंपनी व्यवस्थापनेने महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्था खाजगी कंपन्यांना हस्तांतरित करण्याच्या हालचाली करत आहे या धोरणास महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनचा तीव्र विरोध आहे. शासनाच्या या धोरणामुळे शेतकरी, सामान्य वीज ग्राहक, छोटे उद्योगधंदे यांना मिळणारी सबसिडी बंद होऊन भविष्यामध्ये विजेची प्रचंड दरवाढ होऊ घातली आहे. शासनाचे सदरील धोरण हे सामान्य जनतेच्या हिताचे नसून केवळ मोठमोठ्या भांडवलदारांना प्रचंड नफा मिळवून देण्याचे शासन धोरण आहे.

समांतर वीज परवाना, स्मार्ट मीटर योजना, २०० कोटी रुपयांच्या वरील पारेषणचे प्रकल्प ढइउड पद्धतीने देणे, ही सर्व धोरणे महावितरण व पारेषण कंपनीचे खाजगीकरण आहे. या खाजगीकरणाच्या विरोधात दिनांक ०९.०७.२०२५ रोजीच्या राज्यव्यापी संपाने विरोध करण्याचा महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने ठाम निर्धार केला आहे. या संपामध्ये महाराष्ट्र राज्य वीज कृती समितीने संपाची नोटीस दिली असून ७६००० हजार कर्मचारी/ अभियंते या संपामध्ये सहभागी होणार आहेत.

**खाजगी कंपन्यांचे दावे**

नागपूरच्या तीन विभागामध्ये, औरंगाबाद व जळगाव या तीनही ठिकाणी खाजगी कंपन्यांना वीज वितरण कार्यक्षम पद्धतीने करता न आल्याने फ्रेंच्यायशी धोरणाचा प्रयोग फसल्यामुळे त्यांनी वीज बिलाची थकबाकी वसूल न करता व वसूल केलेली रक्कम वितरण कंपनीकडे न भरता पळ काढला होता हि वास्तविकता जनता व वीज ग्राहक यांच्या स्मरणात आहे.

**महावितरण कंपनीने समांतर वीज परवाना मागितला**

खाजगीकरण धोरणाचा पाठपुरावा करणाऱ्या महावितरण व्यवस्थापनेनेही मुंबई शहरातील कुलाबा, माहीम, बांद्रा, दहिसर असे एकूण १३ क्षेत्रात वीज वितरणासाठी परवाना अर्ज दाखल केला आहे. महावितरणकडे या ठिकाणी कोणतीही पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच महावितरणच्या अखत्यारित असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमध्ये अपुरे कर्मचारी, मेंटनसला लागणारे अपुरे साहित्य यामुळे महावितरण कंपनीतील विविध झोन, सर्कलमधील कामगार कर्मचारी व अधिकारी वीज ग्राहकांना वेळेवर सेवा देऊ शकत नसल्यामुळे अगोदरच त्रस्त आहेत. महावितरण कंपनीने प्रथम आपले घर व्यवस्थित सांभाळावे मग दुसऱ्याच्या घरात पाहण्याचा प्रयत्न करावा म्हणून या खाजगीकरणाच्या धोरणास मान्यता देण्यात येऊ नये असे महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने म्हटले आहे.

**टोरेंट पॉवर कंपनीला १६ शहरांचा ताबा**

महावितरण कंपनीला सर्वात जास्त महसूल देणाऱ्या नागपूरसह १६ शहरांकरिता टोरेंट पॉवर कंपनीने समांतर वीज परवाना मागितला असून अदानी कंपनीने पुणे, पिंपरी चिंचवड, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे यासह अनेक प्रमुख शहरांसाठी वीज वितरण परवान्याचा अर्ज वीज नियामक आयोगाने ग्राह्य धरला असून एकंदरीत वीज वितरण कंपनी वीज ग्राहकांच्या लुटीसाठी महाराष्ट्र शासनाने खाजगी कॉर्पोरेट घराण्यांना देण्याचा चंग बांधलेला आहे म्हणूनमहाराष्ट्र वीज उद्योगातील कामगार, कर्मचारी व अभियंते अधिकाऱ्यांच्या सर्व संघटनांनी व कामगार कर्मचाऱ्यांनी या खाजगीकरणाच्या विरोधात दिनांक ०९.०७.२०२५ रोजी राज्यव्यापी संपाची जोरदार तयारी करावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियनने केले आहे.

# पाऊस नाराज झालाय ?

**पड रं..पाण्या, पड रं..पाण्या.!**
**कर पाणी.. पाणी.. पाणी.!**
**शेत माझं लई .. तान्हेलं**
**चातकावानी..!**


ही अर्त हाक माझा गावकुसातील शेतकरी देत आहे. १९८३ मध्ये जेष्ठ गायक प्रल्हाद जी शिंदे यांनी आपल्या रचनेतुन दुष्काळी स्थीतीच केलेलं वर्णन आज देखील कायमच आहे. २०२५च्या हंगाम पूर्वी जोरदार बरसणारा पाऊस बळीराजाला सुखावणारा ठरला अगदी सगळी कडे पाणीच झाले तेही ५०% प्रमाण झालं. शेतकऱ्यांनीही या संधीचा सोनं केलं, मढं झाकून पेरण्या करा हि पद्धती नसली तरी ती प्रचलीत म्हण आम्ही ऐकतो अगदी तसंच झालं.. पावश्याच्या 'पेरते व्हा' या भावनेला दुजोरा देत शेतकऱ्यांनी धरणी मातेची ओटी भरली व समाधानी झाला. अगदी खरिप हंगामात मोसमी हंगामात तसं ७ जून लाच पेरण्या, लागवडी झाल्या. बळीवंशाच्या अख्या कुंटूबाच्या 'आनंदाला सिमाच उरली नव्हती' आत्ताचे आधुनिक स्वंयघोषित अंदाजक वरूणराज्यांचे 'दलाल'नी तर शेतकरी पार चक्राऊनच सोडला? तासा-तासालाच अंदाज आत्ता खूप पाऊस पडणार: पेरण्या देखील करू देणार नाही!! एवढा पाऊस होईल..? या दलालांच्या अर्धवट अभ्यासात माझा बळिराजा नेहमी प्रमाणे बळी पडला व फसला. तब्बल २०-२५ दिवस होऊन गेले तरीही दलालांनी सांगीतलेल्या पाऊस काही जमीनीवर येईना ? घाई गडबडीत केलेली पेरणी तून कोवळ स्वप्न घेऊन उगविलेलं सोनं आता कोमेजून जाऊ लागलंय..!




पावश्याचा घसा फुटायची वेळ आलीय ? पण यांचा पाऊस काही धरतीची तहाण व शेतकऱ्यांची हरवलेली भूक भागवायला काही येईना ? शेतकऱ्यांच्या घरातील शाळेत जाणारं लहाण लेकरू सुद्धा

**सांग.. सांग भोलानाथ..**
**पाऊस पडेल काय?**
**शाळेत भोवती तळे साचून सुट्टी**
**मिळेल काय?**

हे गाणं म्हणून शांत झालयं ? किती आर्जव माझ्या शेतकऱ्यांचा आहे. हि अवस्था नेहमीच होते. प्राथमिक उत्पादक व जिवनावश्यक वस्तु निर्माता असणारा... उत्तम शेती व्यावसायीक असणारा महाराष्ट राज्यातील शेतकऱ्यांवर ८,३२,२४९ कोटी केवळ पीक कर्जाचा बोजा झालाय ? इतर कर्जाची आकडेवारी तर आकडेच लाजतील एवढी झाली आहे. समृद्ध आसणाऱ्या माझ्या भारत देशात सर्वाधिक कर्जबाजारी होण्याचा महाराष्ट राज्याचा विक्रम होत आहे. यातूनच प्रत्येक दिवसाला होणाऱ्या आत्महत्या हे कशाचं प्रतिक आहे ? या स्थितीला एकटा पाऊस जरी जबाबदार नसला तरी ही... बहुतांश क्षेय जाईलचं कि पावसाकडे. ते असं



मराठवाड्यातील पर्जमानाची स्थिती हि जून व जूलै महिन्यात खरिप हंगामी लागवडीची वेळ पिके उगवण्याच्या स्थितीतच पावसाचा पडणारा खंड त्यातून कसे बसे ताऊन- सुलाखून निघालेली पिके पुढे ऐन उत्पादनाच्या वेळीच ऑगस्ट-सप्टेंबर, मान्सुन परतीचा पाऊस माझ्या शेतक-यांवर एवढा मेहरबानी करतो कि काढणीला आलेलं सोयाबिन, उडीद, पूर्ण पाण्यातच जातं! वेचनीला आलेला कापूस झाडावरच वाती होतात. गुडघाभर चिखलात बाजरी काढावी लागते ? तर कधी- कधी कोरडा दुष्काळ या विदारक अवस्थेला पाऊस च जबाबदार असतो. लागवड ते हाता तोंडांशी आलेलं पीक जातांना जेकि शेतकऱ्यांच्या अख्या कुंटूंबाच्या अनेक स्वप्नांची राख करून टाकत त्यावेळी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या वेदनेला कोण सहारा देणार ? शासन-प्रशासन तर या प्रसंगात वेगवेगळी राष्ट्रीय समस्या सोडवण्यात मशगुल असतं. नेहमी प्रमाणे यंदा देखील गाव खेड्यातील शेतकऱ्यांवर पाऊस पराकोटीचा नाराज झालाय ? पेरण्या होऊन पीके सुसाट वाऱ्याच्या वेगाने उपटून जातील ? उण-सावलीच्या खेळात विविध रोगराईला बळी पडत आहेत. व शासनाचा त्रि-भाषा सुत्रीचा खेळ चालू आहे..! यावर माझा शेतकरी म्हणतोय आमच्या वेदनेची जी भाषा शासन-प्रशासनाला समजेल ती भाषा लागू करा ? हे विदारक चित्र निर्माण झालेय ? एका बिया पासुन हजार बिया निर्माण करणारा माझा बळीराजा ढगाळलेल्या आभाळाकडे चातका पेक्षा हि आर्जव भावनेतून कोसळण्याची विनंती करतोय ! पण हे त्या निसर्गाच्या का लक्षात येत नाही ? या उण-सावलीच्या खेळातून कधी माझ्या शेतकऱ्यांची सुटका होईल ? ह्या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष यक्षाला देखील माहित नसावीत...?

**शिवराम सुधाकर राऊत**
**अध्यक्ष-शिवश्री कृषि मंडळ**
**हिवरसिंगा**

# काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

## अनाथांना अन्नदान, शालेय साहित्य वितरण आर. के. सामाजिक समुहाचा आदर्श पायंडा

माजलगाव । प्रतिनिधी

आपण समाजाचे देणेकरी लागतो, या उदात्त हेतूने काँग्रेसचे युवा नेते दत्ता कांबळे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. दरम्यान, दत्ता कांबळे यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो, ही परंपरा कायम राखली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनु.जाती विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बहुजन विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव दत्ता कांबळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त मतिमंद निवासी विद्यालय बायपास रोड, माजलगाव आणि मुकबधीर विद्यालय जुना शतायुषी हॉस्पिटल दुसरा मजला येथे अन्नदान वाटप कार्यक्रम आर. के. कंपनी या सामाजिक समूहाचे संचालक संकेत भैया कासार, रुद्रा कासार, अभिजित देडे, करण कांबळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.




**वाढदिवसानिमित्त समाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्याची गरज : दत्ता कांबळे**

समाजात वावरत असताना आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो, ही भावना वाढीस लागली पाहिजे. यासाठी खारीचा वाटा उचलत दरवर्षी खासदार रजनी ताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाढदिवस समाजोपयोगी उपक्रम आणि गरजूंना मदत करत असतो. मुळात कोणताही बडेजाव मला पसंत नाही, वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे, असे मला वाटते, अशी प्रतिक्रिया युवा नेते दत्ता कांबळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# बळीराजाच्या बैलगाडा शर्यतीचा थरार काडीवडगावच्या मैदानात

## आयोजक प्रकाश झाटे, सतीश पांडव, नितीन घुगे यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव शिवारात १३ जुलै बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या सात विजेता बैल जोड्यांना यावेळी लाखो रुपये जिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यामुळे या बैलगाडी शर्यतीत सामील मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आव्हान या बैलगाडा शर्यतीचे आयोजक, प्रकाश झाटे, नितीन घुगे सतीश पांडव व समस्त वडवणी तालुक्यातील तरुण वर्गाकडून करण्यात आले आहे.



आजवर मोठ्या रेसकोर्सवर, टिव्ही आणि मोबाईलच्या पडद्यावर शेतकरी पुत्रांनी घोड्यांच्या शर्यती पाहिल्या पण आपल्या घरच्या अंगणात वाढलेला सर्जा-राजा शर्यतीत भाग घेऊन विजयी होतो आणि मालकाचा मान वाढवतो, एवढा आत्मविश्वास आणि अभिमान देणारी परंपरा फक्त बैलगाडा शर्यतीतच अनुभवायला मिळते.

तामिळनाडूतील जनतेने जल्लीकट्टूच्या माध्यमातून आपली संस्कृती, आपली अस्मिता केंद्राने बंदी घातल्यावर राज्यव्यापी आंदोलन करून व सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढून टिकवली, अगदी तसंच आपल्या महाराष्ट्रानेही बैलगाडा शर्यतीवरील बंदीविरोधात ठामपणे उभं राहत, हा आपल्या शेतकऱ्यांच्या जीवनाचा, संस्कृतीचा आणि संघर्षाचा भाग पुन्हा जिवंत केला, परंतु तो जिवंत राहिला पश्चिम महाराष्ट्र पुरताच, आता कुठे सोशल मीडियाच्या माध्यमातून तो आपल्याकडे सरकतोय.

पोटच्या लेकराएवढं प्रेम शेतकरी आपल्या बैलांवर करतो, एखादा वस्ताद आपले पैलवान आखाड्यात उतरवतो, तसंच प्रेम आणि जिव्हाळ्याने बैलगाडा मालक आपले बैल शर्यतीच्या मैदानात उतरवत असतात, बैलगाडा शर्यत आपल्या महाराष्ट्राच्या अस्सल कृषी संस्कृतीचं प्रतीक आहे. सुदैवाने - दुर्दैवाने आज शेतीत यांत्रिकीकरण वाढल्याने बैलांची संख्या दिवसेंदिवस कमी होतेय, काही गावांत तर पोळ्यासारख्या सणाचं स्वरूपच बदललं; ट्रॅक्टरची मिरवणूक काढून पोळा साजरा होतोय. पण, खरंच, वावर कसण्यासाठी, जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी बैलांशिवाय पर्याय आहे का?

हे सर्व बदल आपल्याला स्वीकारावे लागले असले तरी बैल आणि त्यांचं महत्व कधीच कमी व्हायला नको, म्हणूनच, अनेक वेळा शेतकरी आंदोलनांमध्येही आम्ही बैलगाडी घेऊनच तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेलोय; बैलांप्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी !, अलीकडेच वडवणीच्या शेजारी असलेल्या मैंदा गावातील मैदानावर भरणाऱ्या आठवडी बैलगाडा शर्यतीमुळे तालुक्यातील तरुणांमध्ये निर्माण झालेल्या कुतूहलाला वाव देण्यासाठी व तालुक्यातील एखाद्या गावात तरी आज ना उद्या बैलांचे नावाजलेले बाजार पुन्हा फुलावे यासाठी बैलगाडा शर्यतीचा अट्टाहास तालुक्यातील बैलगाडा प्रेमी पोरांनी केला आहे.

बैलगाडा शर्यतीची घोषणा करणे सोपं आहे, पण त्याचं योग्य आणि सुरक्षित आयोजन करणं खूप मोठं जबाबदारीचं काम असत; योग्य नियोजन, नियमानुसार आणि पारंपरिक पद्धतीने तालुक्यात प्रथमच हा जिव्हाळ्याचा सोहळा बैलगाडा प्रेमी घेऊन येत आहेत. आपल्या सर्वांच्या सहकार्याची, उपस्थितीची आणि प्रेमाची आयोजकांना अपेक्षा आहे. शेतकऱ्यांची संस्कृती, संघर्ष आणि बैलांवरील आपलं प्रेम व्यक्त करण्यासाठी अशा या सोहळ्यात मी सहभागी होणार आहे आपणही नक्की सहभागी व्हा!

# पाटोदा तालुक्यातील बसथांब्यांवर निवारा शेड नसल्याने प्रवाशांचे हाल

## तात्काळ बसथांब्यावर निवारा शेड, उभारा सावता सेनेच्या स्वाती कातखडे यांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील पारगाव चौक, राज मोहम्मद चौक, तसेच तालुक्यातील चुंबळी फाटा, वाजरा फाटा आदी ठिकाणी असलेल्या बसथांब्यांवर निवारा शेड नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक व महिलांना उन्हा-पावसात थांबावे लागत असल्याने त्यांचे हाल सुरू आहेत.



या समस्येबाबत सावता सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षा सौ. स्वाती कातखडे यांनी आवाज उठवला असुन त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रशासनाला मागणी केली की, पाटोदा शहर व तालुक्यातील सर्व बसथांब्यांवर तातडीने निवारा शेड उभारण्यात यावेत. नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष होणे, हे शासनाच्या जबाबदारी पासून पळ काढणे आहे.

स्वाती कातखडे यांनी यापूर्वीही सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली असून, जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या कायम कार्यरत आहेत. यावेळी त्यांनी इशारा दिला की, जर लवकरात लवकर पाटोदा तालुक्यातील बस थांब्यावर निवारा शेड उभारण्यात आले नाहीत, तर सावता सेना रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही सावता सेनेच्या महिला बीड जिल्हा अध्यक्ष स्वातीताई कातखडे यांनी दिला असुन गावा गावांतील बसथांब्यांवर बसण्यासाठी बाक व निवारा शेडचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या सगळ्या समस्या ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका ठरू शकतात, असेही त्या म्हणाल्या. या मागणीची दखल घेऊन प्रशासन काय पावले उचलते, याकडे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# केळवणे येथे डॉ. निशिगंधा देविदास शिवकर यांच्या श्रीदत्त डेंटल क्लिनिक'चे उदघाटन

केळवणे-पनवेल । प्रतिनिधी

केळवणे गावात प्रथमच सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी डॉक्टर डी सी. शिवकर यांची कन्या निशिगंधा शिवकर यांच्या श्रीदत्त डेंटल क्लिनिक चे उद्घाटन सोमवार ७ जुलै ला आगरी मंच पेण चे संस्थापक अध्यक्ष कै. वाय.एन. म्हात्रे यांच्या पत्नी गं.भा. यशोदा म्हात्रे यांच्या हस्ते झाले.




डॉ. निशिगंधा शिवकर यांनी दंतशल्य विशारद (बी.डी.एस.) ही पदवी येरला मेडिकल कालेज - वाय.एम.टी-मुंबई येथून संपादन केली असून तीन वर्षे मुंबई चर्चगेट येथील जी.डी.सी. डेंटल हॉस्पीटल (सेंट जॉर्जेस) या सरकारी डेंटल हॉस्पिटल तसेच खाजगी हॉस्पीटलमध्ये अनुभव घेतल्यानंतर आपल्या ज्ञानाचा, आपल्या गावाला लाभ व्हावा, खेड्यातील लोकांना कमी दरात उत्तम सुविधा मिळावी म्हणून सर्व सुविधांनी युक्त असा दातांचा दवाखाना उघडण्याचे ठरविले.

वैद्यकशास्त्राचे उच्च शिक्षण घेतलेले डॉक्टर खेड्यात दवाखाना चालवण्यास फारसे उत्सुक नसतात मात्र सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वडिलांप्रमाणेच समाजकार्यासाठी डॉक्टर निशिगंधा यांनी ते धाडस केले, म्हणून सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे, या डेंटल क्लिनिकमध्ये डिजिटल एक्सरे, रुट कॅनल ट्रीटमेंट, दात काढणे, मशीन व्दारे दात साफ करणे, कृत्रिम दात बसवणे (कायमचे/तात्पुरते, कवळी बसविणे, कंपोझिट/कॉस्मेटिक फिलींग (दाताच्या रंगाची फिलींग), हिरड्यांच्या आजाराची ट्रिटमेंट, लहान मुलांच्या दातांची ट्रिटमेंट, अक्कल दाढ काढणे, वेडे वाकडे दात सरळ करणे, इम्लांट, ब्लिचींग अशा विविध सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

सदर उद्घाटन सोहळ्यास सरपंच गुरुराज ठाकूर, ग्राम. सदस्य कुमार पाटील, हिराजी शंकर शिवकर, ह.भ.प. सदाशिव जाना शिवकर, वि.ना. कोळी गुरुजी, अनंत माळी, डॉ. योगेश म्हात्रे, संजय पाटील, कृष्णा भगत सर, अशोक पाटील, गोलिपकर सर, आदी मान्यवर उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवून डॉ.निशिगंधा शिवकर यांना शुभेच्छा दिल्या.



नीट परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवत जिल्ह्याचे नाव उज्वल करणारे धानोरा रोड परिसरातील अनुराग बाबासाहेब मोरे यांचा सत्कार समारंभ आयोजित केला. यावेळी उपस्थित शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रतन गुजर, विठ्ठल गुजर, सुनील गुजर, पत्रकार नितेश उपाध्ये यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.



बीड मधील सुप्रसिद्ध नोटरी वकील गहिनीनाथ केकान सर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अ‍ॅड निळकंठ बारगजे, अ‍ॅड दिपक रोटे, राईटर शंशाक धन्वे, लोकशाही पत्रकार संघ बीड शहर उपाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील, सौरभ मुंडे, सुनिल बिवरे, टाकुर, कैलास गिते सर सह आदी मान्यवर उपस्थित होते व शुभेच्छा दिल्या.

# स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिरची अध्यात्म व पर्यावरण दिंडी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदीरच्या वतीने विद्यार्थ्यांनी अध्यात्म व पर्यावरण या दोन्ही विषयानुरूप दिंडी सोहळा साजरा केला. पारंपारिक पोशाख परिधान करून चिमुकल्यांनी हातात टाळ, मृदंग घेऊन सांप्रदायिक भजने, पाऊले खेळली विठ्ठल नामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला.



**पर्यावरण दिंडीचा उत्साह**

पर्यावरण दिंडीचा सोहळा देखील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहत साजरा केला वृक्ष लावा, जीवन वाचवा, प्लास्टिक हद्दपार, पर्यावरणाचा जयजयकार, शुध्द हवा, निरोगी शरीर, स्वच्छता राखा, निसर्ग वाचवा अशा घोषणा दिल्या अध्यात्म व पर्यावरण दिंडी सोहळ्यातील सहभागी चिमुकल्यांचे संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या मनात संस्काराचे बीज रोवणाऱ्या दिंडी सोहळ्याच्या आयोजना साठी मुख्याध्यापिका स्वरूपा दिग्रसकर, दिपाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या मंदिरातील इतर शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# ग्रामऊर्जा फाउंडेशन ची योजना वारी

जायभायवाडी । प्रतिनिधी

ग्रामऊर्जा ह्यूमन डेव्हलोपमेंट फाउंडेशन संस्थेच्या माध्यमातुन या वर्षी योजना वारी चे आयोजन करण्यात आले होते. या वारी मध्ये टाळ मृदूंगा बरोबर विविध शासकीय योजनांचा देखील जयघोष होता. शासनाच्या हजरो योजना आहेत परंतु माहितीच्या आभावामुळे, अपुऱ्या कागदपत्रा मुळे, तसेच वेळेत माहिती नं मिळाल्या मुळे, अनेक गरजु लाभार्थी योजनानं पासुन वंचित राहतात, हिच गोष्ट लक्षात घेऊन ग्रामऊर्जा फाउंडेशन च्या माध्यमातुन विविध योजनांची जनजागृती या वारी मधुन करण्यात आली. या वारी मध्ये विविध योजनांचे माहिती फलक, पोस्टर दाखवून त्यावर गावकर्यांन सोबत चर्चा करण्यात आली. मोठ्या उत्साहाने योजना वारी मध्ये भाजणी मंडळ, महिला, शेतकरी, विद्यार्थी व ग्रामऊर्जा टीम उपस्थित होती.



बीड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना बाजीराव ढाकणे, बीड जिल्हा समन्वयक, लेक लाडकी अभियान तथा महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व सामाजिक कार्यकर्ते गुलाब पठाण.

# पत्रकार जगन सरवदे यांना मातृशोक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते जगन सरवदे यांच्या मातोश्री सुलोचनाबाई प्रभाकर सरवदे यांचे वृद्धापकाळाच्या आजाराने ८ जुलै मंगळवार रोजी पहाटे ४:३० वा. दु:खद निधन झाले. सुलोचनाबाई यांची प्रकृती गेल्या अनेक वर्षांपासून वार्धक्याचे आजारामुळे क्षीण झाली होती. त्यांचे पश्चात जगन्नाथ, नवनाथ ही दोन मुले-सुना, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



एक मनमिळाऊ आणि दुस-यांच्या अडीअडचणीला धावून जाण्याच्या स्वभावामुळे सुलोचनाबाई ह्या रमाई व बोधीघाट वसाहतीत सर्व परिचित होत्या. त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सुलोचनाबाई यांच्या पार्थिवावर ८ जुलै रोजी सायंकाळी चार वाजता अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण चौक परिसरातील शासकीय दुध डेअरी समोरील सार्वजनिक स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## दाखला हरवला आहे

विष्णु किसन पालवे, मु.पो.पिंपरखेड हिवरा ता.आष्टी, जि.बीड या नावाचा १२ वी पासचा दाखला पिंपरखेड ते धानोरा प्रवासात हरवला आहे. सापडल्यास योग्य बक्षीस दिले जाईल.

संपर्क
**विष्णू पालवे**
पिंपरखेड हिवरा
ता.आष्टी.जि.बीड
मो.९८९०४७६७४७

# लोकशाही पत्रकार संघांच्या सुरेंद्र रानेकर यांची संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवडी जाहीर

सिल्लोड । प्रतिनिधी

सुरेंद्र रानेकर यांची संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवडी जाहीर करण्यात अली आहेत. ह्या निवडी संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, महिला अध्यक्ष निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, हलिमा शेख प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती, आयेशाखान मुलानी प्रदेश कार्याध्यक्ष, प्रदेश अध्यक्ष उद्योग विकास समिती मनीषा धिरडे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी, डॉ. विजय जगताप प्रदेश उपाध्यक्ष आरोग्य विकास समिती, राणी झुंजूर्डे जिल्हा अध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती यांनी निवडी जाहीर केल्या आहेत.



सं. अ. बीबी वैद्य म्हणाले की, महाराष्ट्र राज्य जिल्ह्यातील सर्व तालुक्यात लोकशाही पत्रकार संघ संलग्न सर्व विकास समिती च्या कार्यकारणी लवकरच तयार करण्यात येतील. या समिती मार्फत लोकांचे सामाजिक, आर्थिक, वयक्तिक, शासकीय योजनाची कामे केली जातील. विशेष म्हणजे महाराष्ट्र मधील वंचित कलाकार यांना छोटे मोठे काम देण्याचा आम्ही प्रयत्न करू. यावेळी संस्थापक अध्यक्ष भागवत (बीबी) वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, प्रदेश उपाध्यक्ष पंढरी पवार, प्रदेश अध्यक्ष राजेंद्र कांबळे कला क्रीडा सांस्कृतिक विकास समिती, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, सुनंदा केदार राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे - उद्योग विकास समिती, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, वसीम आजाद, साजेद सय्यद, मराठवाडा उपाध्यक्ष डिजिटल मीडिया चे नितेश उपाध्ये, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी, रहीम जहांगीर, नंदा भंडारे, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती हलिमा शेख, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मन:पूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत. या कार्यक्रम चे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. गणेश खोपे यांनी केले.

आरंभ
बीड जिल्हा
मंगळवार दि. ८ जुलै २०२५


# आचार्य टाकळी येथे अवैध दारू माफियांच्या विरोधात कारवायांचा धडाका सुरु

## सिरसाळ्याचे एपीआय गोरखनाथ दहिफळेची दबंग कारवाई

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा दिनांक ७ जुलै २०२५ रोजी सिरसाळा परिसरातील मोजे आचार्य टाकळी या ठिकाणी सिरसाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आचार्य टाकळी जि.प.प्र शाळेच्या काही आतरावर अवैध दारू विक्री करीत असल्याने सिरसाळा पोलीसाची धडाकेबाज कारवाई करण्यात आली आहे.

सिरसाळा परिसरातील मोजे आचार्य टाकळी या ठिकाणी अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई करण्यात आली असून पो.गुरन.१८६ड़२०२५ कलम ६५ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम फिर्यादी वैभव वैजनाथ देवकते वय ३५ वर्ष पोअ.१८९८ ने पो.सिरसाळा आरोपी नं. १) गिताराम श्रीरंग किरवले, २) मुरलीधर श्रीरंग किरवले, ३) गणेश शकर किरवले सर्व रा.आ.टाकळी ता.परळी.जि.बीड गु.घ.ता.वेळ ठिकाण दिनांक ७.७.२०२५. रोजी २० वाजता मुझे अजय टाकळी येथे शाळेच्या



पाठीमागे मोकळ्या जागेत मिळाला. १) ३५०० दोन पिवळ्या रंगाचे २० लिटर क्षमतेचे कॅटमध्ये अंदाजे ४० लिटर हातभट्टीची तयार दारू प्रति लिटर ७० रुपये प्रमाणे २८०० रू चा माल व दोन पिवळ्या रंगाचे ०५ लिटर समतेचे कॅन्डमध्ये अंदाजे १० लिटर तू भट्टी ची तयार दारू प्रति लिटर ७०रु प्रमाणे ७०० रु चा.माल देशी दारू सखु संत्रा प्रीमियम कंपनीच्या ५० बॉटल प्रति बॉटल ७० रुपये प्रमाणे ३५००रु चा. माल मेक डॉल नंबर १ कंपनीचा दोन लिटर समतेचा खंबा त्याची विक्री किंमत प्रति प्रति खंबा १६००.रु प्रमाणे एकूण ८६०० रुपये आज दि.७.७.२०२५.रोजी देशी २०.०० वाजता नामे १) गिताराम श्रीरंग किरवले, २) मुरलीधर श्रीरंग किरवले, ३) गणेश शकर किरवले सर्व राहणार आचार्य टाकळी तालुका परळी जिल्हा बीड ही तिचे आचारी टाकळी येथे शाळेच्या पाठीमागे मोकळ्या जागेत गावठी हातभट्टीची तयार दारू व मॅकडॉल नंबर वन कंपनीचे दोन लिटर समतेचा खंबापूर देशी दारू सखु संत्रा कंपनीचा स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करत असताना त्यांच्या ताब्यातील प्रो गुन्ह्याचा आम्हा पोलीस पार्टीस पाहून जागीच पाहून पळून गेले म्हणून माझी त्यांच्याविरुद्ध कलम ६५ (ई) ६५ ( फ) मु.प्रो.का. प्रेमाप्रमाणे फ्रिर्याद आहे.

सिरसाळा पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी गोरखनाथ दहिफळे. याच्या मार्गदर्शनाखाली सिरसाळा पोलीस ठाण्याचे पोलीस देवकते, पोलीस रूपनर, पोलीस वाघमारे आधिक तपास पोलीस हे करीत आहेत.

# बातम्या देऊनही राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांचा गलथान कारभार

## रघुनाथराव पेट्रोल पंपाजवळ एसटीचा भीषण अपघात याला जबाबदार कोण : अँड.मनोज संकाये

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी अंबाजोगाई महामार्गावरील कन्हेरवाडी येथे असणाऱ्या रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ बसचा भीषण अपघात झाला त्यामध्ये प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळाली वारंवार बातम्या देऊन आणि अधिकाऱ्यांना सांगून सुद्धा महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा भीषण प्रकार घडला घडला असून याला जबाबदार कोण असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे.

काल रात्री हा अपघात झाला आहे. थातूरमातूर रेडियम चे रघुनाथ मुंडे पेट्रोल पंपाजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी काम केल्याने ते निघून गेले परिणामी त्या ठिकाणी अपघात झाला या अपघातामध्ये बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामध्ये असणाऱ्या प्रवाशांना सुद्धा शारीरिक हानी भोगावी लागली आहे. अशा वारंवार घटना या अगोदरही याच ठिकाणी घडल्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आहे. याकडे संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष दिले असते तर अशी घटना घडली नसती भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी योग्य ती उपयोजना करणे गरजेचे आहे.

अपघातामध्ये माणसांचा बळी जाण्याची शक्यता आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा लागेल अन्यथा रेडियमचे काम करून घ्यावे अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.





सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयास भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भेट दिली. यावेळी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना संपादक दीपक थोरात, निवासी संपादक उद्धव आरे, भाजपा नेते भूषण पवार, प्रमोद ठोंबरे आदी.

# परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भुरट्या चोरांचा उच्छाद

## भुरट्या चोरांना परळी शहर पोलीसांचे अभय ?

परळी । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासनाचा वचक राहावा म्हणून आय.पी.एस. अधिकारी नवनीत कावंत यांची एस.पी. म्हणून बीड जिल्हा येथे पाठवण्यात आलं, परंतु सुरुवातीला काही दिवस वाटलं होतं, पोलीस प्रशासनाने आपली आलेली मरगळ झटकून कामाला सुरुवात केली आहे. तसा काही जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांनी आव देखील आणला व थातूरमातूर पोलीस कारवाया दाखवून एस.पी. नवनीत कावत यांचे मनही जिंकले. पण कार्यपद्धती बघून अनेकांच्या बदल्या देखील करण्यात आल्या परंतु आता परिस्थिती पहिल्यासारखीच जैसे थे आहे.

पोलीस प्रशासनाला सर्वसामान्य जनतेच्या संरक्षणासाठी, अडचणीसाठी, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी काम करावं लागतं, परंतु त्याला हरताळ फासत,




पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकारी काम करत आहेत असंच चित्र सध्या दिसत आहे. मटका, गुटका, बिंगो, ऑनलाइन लॉटरी, पत्तेचे क्लब, अवैध धंदे, हातभट्टी विक्रेते यांना खुलेआम विक्री करण्याची परवानगी दिली आहे का ? असे चित्र सध्या परळी शहरात दिसून येत आहे.

या सर्व अवैध धंद्यामुळे व्यसनाधीन झालेल्या तरुण व बिघडलेल्या मुलांकडून भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण दर दिवस कुठेतरी चोरी होत आहे. या भागातील नागरिकांना याचा फटका बसला आहे व बसत आहे. त्यामध्ये छोटी छोटी दुकाने फोडणे, दुकानात कोणी नसताना दुकानातील गल्ला चोरणे, घराच्या बाहेर लावलेल्या टू व्हीलर, थ्री व्हीलर फोर व्हीलर या गाड्यांमधून बॅटऱ्या चोरणे, नळाचे पाणी घरामध्ये घेण्यासाठी लावलेल्या विद्युत मोटारी चोरणे, गॅसचे सिलेंडर, सायकल, मोटरसायकल, पाळीव प्राण्यांमध्ये शेळ्या, लहान मुलांच्या गळ्यातील सोन्याची पान, हातातील उपायातील चांदीचे वाळे, बोकड, गाई, म्हशी, घराच्या बाहेर ठेवलेले गृह उपयोगी भांडे, स्टील, पितळ, जर्मल, बकेट हांडे, घागरी असे साहित्य चोरी सर्रासपणे दर दिवस होत आहे. भुरट्या चोऱ्यांचे सत्र सुरू असतानाच शहर पोलिसांना मात्र हे भुरटे चोर शोधूनही व माहिती देऊ नाही सापडत नाही. यामुळे परळी शहर पोलीस प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भुरट्या चोरांचा आणि पोलिसांचा जसं काही साठेलोटच आहे असंच चित्र सध्या तरी परळी शहरात दिसून येत आहे. परिसरातील चोरीचे सूत्र जर थांबले नाही तर या प्रकरणाचा सविस्तर अहवाल तयार करून जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावंद यांच्याकडे भुरट्या चोरांचा बंदोबस्त करावा याची मागणी करण्यात येणार आहे.

पत्रकार बालाजी जगतकर यांच्याकडून भुरटा चोर पकडून देणारास किंवा माहिती पुरवणारस १०००/–रु चे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. परळी शहरातील जगतकर गल्ली, आदोडे गल्ली, ताटे गल्ली, रमानगर, प्रबुद्ध नगर, साठे नगर, भीमनगर परळी या भागातील भुरटे चोर यांचे फोटो व्हिडिओ किंवा माहिती पाठवण्यासाठी मोबाईल क्रमांक ९९६०१७४५९७

## इंजि. सादेक इनामदार यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा परत घेण्यासाठी अप्पर पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद येथील शिक्षक भरती घोटाळा सादिक इनामदार यांनी उघडकीस आणलेला आहे व त्याचे पडसाद विधानसभेत देखील उमटले आहेत. त्याचा राग मनात धरून नवनियुक्त शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. बीड श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी शिक्षक भरती घोटाळ्याचे प्रकरण दडपण्याच्या उद्देशाने व सादेक इनामदार यांच्यावर दबावतंत्राचा वापर करून त्यांच्यावर विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केलेला आहे. या गुन्ह्यामध्ये कुठलेही तथ्य नाही.

सादेक इनामदार यांच्याकडे शस्त्र परवाना जरी असला तरी त्यांनी त्याचा शासकीय कार्यालयात कधीही गैरवापर केलेला नाही व त्या शस्त्राचा धाक दाखवुन कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास दाबदडप केलेला नाही.



त्यांना त्यांच्याकडील शस्त्र हे त्यांच्या स्वसंरक्षणासाठी दिलेले आहे.

सादेक इनामदार यांनी बीड जिल्ह्यातील यापुर्वी अनेक भ्रष्टाचार उघडकीस आणलेले आहे. व ते निस्वार्थपणे गोर गरीब लोकांची कामे करतात. त्यामुळे त्यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा व खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या शिक्षणाधिकारी (मा.) जि.प. बीड श्रीमती प्रियाराणी पाटील यांना निलंबीत करण्यात यावे व भविष्यामध्ये असे जर भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या विरुद्ध व बातमी प्रसिद्ध करणाऱ्या पत्रकाराविरुद्ध असे खोटे गुन्हे दाखल होत असतील तर प्रशासनाने अशा खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या वरती कारवाई करावी या मागणीचे निवेदन देताना बीड नगर परिषदेचे मा सभापती खुर्शीद आलम साहेब, शेख अमीर, मा नगरसेवक बीड शेख फसीयुद्दीन, मा नगरसेवक धारूर शेख रहीम, प्रहार संघटना जिल्हा उपाध्यक्ष बीड मोमीन साहेब सामाजिक कार्यकर्ते बीड यांनी निवेदन दिले.



आज भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप कार्यालय येथे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना भाजपचे अल्पसंख्यांचे मुसाखान पठाण, शेख इर्शाद भाई बिल्डर, बालाजी पवार, मुन्ना फळ, कपिल सौदा, मिसाळ साहेब व इतर भारतीय जनता पक्षाचे दिसत आहेत.

### बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील शेत रस्त्याचा निर्णय बरोबर : सुरवसे

## वाळू माफियांकडून तहसीलदारांची बदनामी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील शेत रस्त्याच्या संदर्भात बीडच्या तहसीलदारांनी आर्थिक देवाण–घेवाण करून चुकीचा रस्ता दिल्याचा आरोप काही दिवसांपूर्वी काही शेतकऱ्यांनी केला होता. मात्र दिलेला निर्णय बरोबर असून वाळू माफियांना दुसरा रस्ता अवैध वाहतुकीसाठी लागत असल्याने निर्णय बदलण्यासाठी तहसीलदारांना बदनाम करून दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप शेतकरी कांता सुरवसे यांनी केला आहे.




तहसीलदारांनी दिलेला निर्णय कागदोपत्री आणि प्रत्यक्ष स्थळ पाहणी वरून बरोबर आहे. काही दिवसांपूर्वी वाळू माफियांनी तहसीदार यांच्याकडे येऊन संबंधित शेतात जाण्यासाठी दुसऱ्या रस्त्याची मागणी केली होती, परंतु पर्यायी रस्ता असताना दुसरा रस्ता देता येत नाही, तहसीलदार यांच्यावर वाळू माफियांनी अनेक आरोप केले परंतु तहसीलदारांनी योग्य निर्णय घेऊन रस्ता दिलेला आहे. तो आम्हाला मान्य आहे. तो निर्णय कायम ठेवावा यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांना कांता सुरवसे, सुभाष काळे आणि इतर शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे.

# बीड तालुक्यात वादाचे कारण ठरू शकणारे अनेक रस्ते खुले

### सामोपचाराने, तातडीने हिवरापहाडी येथील शेतरस्ता खुला; तहसीलदार शेळके यांचा पुढाकार



बीड । प्रतिनिधी

हिवरापहाडी येथील अंतर्गत वादाने अडवलेला रस्ता चार जून रोजी अर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत समोपचाराने खुला करण्यात आला. महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताची निर्णय घेतले आहेत. बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत. विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून समोपचाराने रस्त्याची प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आहे.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे. बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावी अशी सांगत असतात. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत. गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो.

हिवरापहाडी येथील शेतरस्त्याच्या मागणीवरून अर्जदार सुरेश यदा लिंगे व इतर यांच्या म्हणण्यानुसार गट नंबर १२५ मध्ये जाण्यासाठी पूर्वापार चालत आलेला रस्ता हा दक्षिण – उत्तर असलेल्या ओढ्यापासून आहे. सदर गट नंबर मध्ये जाणारा ओढ्याचा रस्ता दोन तीन शेतकरी यांनी अडवलेला होता. सुमारे पंचवीस शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग, व्यवसाय करत आहेत. गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार नसून गट नंबर १२५ मध्ये जाण्या– येण्यासाठी हिवरापहाडी ते देवळा या गावच्या शिव रस्त्यावरून रस्ता उपलब्ध आहे अशी भूमिका घेतली होती.

तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम सानप व ग्राम महसूल अधिकारी ओंकार गायके, हिवरापहाडी यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करून रस्ता खुला करणे बाबत आदेशित केले. त्यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी जायमोक्यावर जाऊन स्थळ पाहणी करून पंचनामा केला व अर्जदार / गैरअर्जदार यांना सस्ती अदालतीचे महत्त्व पटवून देऊन रस्ता खुला करण्यास विनंती केली. स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले.

यावेळी मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी ओंकार गायके यांनी तहसीलदार बीड यांच्या आदेशान्वये सस्ती अदालतीचे महत्त्व सांगून सामोपचाराने रस्ता खुला केला. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच अशोक शिंदे, उपसरपंच राजाभाऊ पालवे, तंटा मुक्ती अध्यक्ष नवनाथ खरात, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन भारत रूपनोर व आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके यांचे आभार व्यक्त केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT